
# 87 जागांसाठी 765 उमेदवारांचे नामांकन

## अमरावती महापालिका निवडणुकीचा धुरळा ◆ स्वबळावर अजित पवार गट, युतीच्या गोटात खडाजंगी



### पक्षनिहाय उमेदवार संख्या

| पक्ष | | उमेदवार |
|---|---|---|
| राष्ट्रवादी काँग्रेस (अजित) | : | 87 |
| काँग्रेस | : | 75 |
| शिंदे शिवसेना | : | 71 |
| भाजप | : | 69 |
| वंचित व संयुक्त मंच | : | 55 |
| शिवसेना (उबाठा) | : | 45 |
| युवा स्वाभिमान पक्ष | : | 41 |
| बसपा | : | 32 |
| राष्ट्रवादी काँग्रेस (शरद) | : | 25 |
| एआयएमआयएम | : | 24 |
| आम आदमी पक्ष | : | 09 |

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.30 )** – अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा बहुप्रतिक्षित मुहूर्त अखेर लागला आहे. शहरातील 22 प्रभागांतील 87 जागांसाठी मंगळवार (23 डिसेंबर) पासून सुरू झालेली नामांकन प्रक्रिया मंगळवारी (30 डिसेंबर) दुपारी 2 वाजता पूर्ण झाली. या निवडणुकीत विविध पक्ष व अपक्ष मिळून तब्बल 765 उमेदवारांनी महापालिका प्रशासनाकडे अर्ज दाखल केले आहेत. बुधवारी (31 डिसेंबर) होणाऱ्या छाननीनंतर उमेदवारांची अंतिम संख्या स्पष्ट होणार आहे. तर 2 जानेवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असून, 3 जानेवारीला चिन्हवाटपानंतर प्रचारयुद्ध रंगणार आहे.








### राष्ट्रवादी ( अजित पवार गट ) चे 87 ही जागांवर उमेदवार

या निवडणुकीत सर्वाधिक चर्चा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या रणनीतीची होत आहे. सर्व 87 जागांवर उमेदवारी देऊन, आमदार संजय खोडके यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने 'एकला चलो रे' धोरण जाहीर केले आहे. कोणत्याही पक्षाशी युती न करता, स्वबळावर लढण्याचा निर्धार संघटनात्मक बळावर आधारित असल्याचे पक्षाचे म्हणणे आहे. मात्र हा आत्मविश्वास मतपेटीत कितपत टिकतो, हे निकालावेळीच स्पष्ट होणार आहे.

### इतर पक्षांचीही झुंज

या व्यतिरिक्त, वंचित बहुजन आघाडीचे 55 ते 60, युवा स्वाभिमान पक्षाने 41, राष्ट्रवादी (शरद) गटाने 25, बसपाने 32, एआयएमआयएमने 24, तर आम आदमी पक्षाने 9 उमेदवार दिले आहेत. अपक्षांचीही मोठी संख्या निदर्शनास आली आहे. नामांकन, छाननी, माघारी व चिन्हवाटपाची पुढील टप्पे पार पडताच अमरावतीत खरी राजकीय धुरळा उडणार असून, शहरातील वातावरण तापत चालले आहे. पुढील काही दिवसांत कोणाच्या रणनीतीला जनता पसंती देते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### भाजप-शिंदे सेना युती तुटली; वेगवेगळा लढा

भाजप आणि शिंदे शिवसेनेची आघाडी तुटल्याने शहरातील राजकीय समीकरणे पालटली आहेत. युती तुटताच, शिंदे शिवसेनेने अवघ्या काही तासांत 71 उमेदवारांची घोषणा करत आक्रमक पवित्रा घेतला. जवळपास सर्व प्रभागांत उमेदवार देऊन स्वबळावरचा लढा जाहीर केला आहे. दुसरीकडे, भाजपने 69 उमेदवार उभे केले असून, ते तुलनेने सावध धोरणात दिसत आहेत. काही प्रभागांत भाजप अनुपस्थित राहिल्याने, त्याचा परिणाम शिंदे सेना किंवा विरोधक यांच्यात कोणाला होणार, याबाबत तर्कवितर्क रंगले आहेत.

### युतीसह काँग्रेस मैदानात; 75 उमेदवार रिंगणात

काँग्रेसने शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि मनसेसोबत हातमिळवणी केली आहे. काँग्रेसने 75 उमेदवार उभे केले असून, 12 जागा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला) सोपवण्यात आल्या आहेत. विरोधी मते एकत्र करण्याच्या हेतूने ही युती उपयुक्त ठरेल, असा पक्षाचा दावा आहे. मात्र मित्रपक्षांतील मैत्रीपूर्ण लढतीमुळे मतविभाजन होण्याची भीतीही व्यक्त होत आहे.

# नंदुरबारच्या 'नायडू गँग'चा कुख्यात चोर गजाआड

■ वाहनांची काच फोडून चोरी करणारी आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश
■ अमरावती आयुक्तालय हद्दीतील चार गुन्ह्यांची उकल

### शहर गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 30 )** – शहरात चारचाकी वाहनांची काच फोडून त्यातील नगदी रक्कम व लॅपटॉप चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील एका सराईत आरोपीला अमरावती शहर गुन्हे शाखेने अटक करून आयुक्तालय हद्दीतील एकूण चार गुन्ह्यांची उकल केली आहे.

21 डिसेंबर 2025 रोजी राजापेठ व सिटीकोतवाली पोलीस ठाण्यांच्या हद्दीत चारचाकी वाहनांची काच फोडून चोरी केल्याच्या सलग चार ते पाच घटना घडल्या होत्या. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले होते. या गुन्ह्यांची पद्धत एकसारखी व विशिष्ट स्वरूपाची असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याने हे गुन्हे एका विशेष टोळीकडून करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. त्यानुसार गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी घटनास्थळांना भेट देत सविस्तर माहिती घेतली व सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे यांच्या पथकाला गुन्हे उघड करण्याचे आदेश दिले. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासाच्या आधारे ही चोरी नंदुरबार जिल्ह्यातील कुख्यात 'नायडू गँग'ने केल्याचे निष्पन्न झाले. तपासादरम्यान आरोपी बडनेरा रेल्वे स्टेशन परिसरात फिरत असल्याची माहिती मिळताच गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून कार्तिक वालू नायडू (वय 27, रा. वाकीपाडा, पोस्टे करंजी खुर्द, ता./पो.स्टे. नवापूर, जि. नंदुरबार) यास ताब्यात घेतले. आरोपीला विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने आपल्या अन्य दोन साथीदारांसह राजापेठ व सिटीकोतवाली हद्दीत चारचाकी वाहनांची काच फोडून चोरी केल्याची कबुली दिली.

### चार गुन्हे उघड, पोलिस पथकाची कामगिरी

आरोपींनी राजापेठचे 3, सिटी कोतवालीच्या एका गुन्ह्यांची कबुली दिली आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, गणेश शिंदे, श्याम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलिस हवालदार फिरोज खान, सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, सैय्यद नाझीम, रंजीत गावंडे व चालक प्रभात पोकळे यांनी केली.

# घरफोडी व मंदिरातील चोरी करणाऱ्यास अटक

### एक फरार ; दोन चोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 30 )** – शहरात घरफोडी व मंदिरांतील चोरी करणाऱ्या आरोपीस गुन्हे शाखा पोलिसांनी गांधी चौक परिसरातून अटक केली आहे. आरोपीने बडनेरा व खोलापुरी गेट पोलिस ठाणे हद्दीत चोरी केल्याची कबुली दिली आहे. गोपाल मोहन युवनाते (वय 42, रा. पांढरघाटी, वरूड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

खोलापुरी गेट पोलिस ठाणे हद्दीत 29 डिसेंबर रोजी समांतर तपास सुरू असताना अमरावती ग्रामीण गुन्हे शाखेकडून पक्की माहिती मिळाली की, संबंधित गुन्ह्यातील आरोपी गांधी चौक परिसरात अशाच प्रकारचे गुन्हे करण्याच्या उद्देशाने फिरत आहे. या माहितीनुसार पोलिसांनी गांधी चौक परिसरातून गोपाल युवनाते याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने आपल्या साथीदार रामचंद्र युवनाते याच्यासह शहरातील खोलापुरी गेट व बडनेरा पोलिस ठाणे हद्दीत मंदिरांमध्ये चोरी केल्याची कबुली दिली. फरार साथीदाराचा शोध सुरू असून, मुख्य आरोपीला ताब्यात घेऊन पुढील कारवाई करण्यात येत आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गजानन सोनुने, दीपक सुंदरकर, सचिन बहाले, जहीर शेख, अतुल संभे, सूरज चव्हाण, राजीक रायलीवाले व निखिल गेडाम यांनी केली.

### अवैध रेती जप्त

**अमरावती** – मोर्शी तालुक्यातील शिरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पुसला ते लिहिदा मार्गातील चौफुलीवर स्थानिक गुन्हे शाखेने अवैध रेती वाहतूक पकडली. चालक कमलेश काकडे व वाहनमालक किरण नेवारे (दोन्ही रा.नया वाठोडा) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढिल तपास मोर्शी पोलिस ठाण्याचे पोलिस करीत आहे.

# कंत्राटदार नसल्याचे स्वयंघोषणापत्र अनिवार्य

महासागर | प्रतिनिधी

*अमरावती, ( दि. 30 ) – आगामी अमरावती महापालिका निवडणुकीत उमेदवारांसाठी निवडणूक आयोगाने कडक नियम लागू केले असून, कंत्राटदार उमेदवारांना थेट 'नो एन्ट्री' करण्यात आली आहे. उमेदवार तसेच त्यांचे कुटुंबीय महापालिकेचे कंत्राटदार नसल्याचे स्वयंघोषणापत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच अनधिकृत बांधकाम, भ्रष्टाचार, थकबाकी, अपत्यसंख्या, निवडणूक खर्च या सर्व बाबींवर स्वतंत्र शपथपत्र देणे बंधनकारक ठरविण्यात आले आहे.*

महापालिकेची थकबाकी असलेले किंवा 12 सप्टेंबर 2001 नंतर तिसरे अपत्य जन्मास आलेल्यांना उमेदवारी मिळणार नाही. निवडून आल्यानंतर भ्रष्ट मार्गाचा अवलंब करणार नाही व कंत्राटे घेतली जाणार नाहीत, याची हमी उमेदवारांना द्यावी लागणार आहे. अर्जातील माहिती चुकीची आढळल्यास, निवडणुकीनंतरही अपात्रतेची कारवाई करण्याचा अधिकार प्रशासनास राहणार असल्याचे निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे. निवडणूक निकालानंतर 30 दिवसांत खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या उमेदवारांनाही अपात्र ठरवले जाईल. जात पडताळणी, शौचालय वापर प्रमाणपत्र, नमुना स्वाक्षरी यांसह सर्व माहिती अर्जासोबत जोडणे आवश्यक केले.

# माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता यांचा शिवसेना (शिंदे गट) ला रामराम

## म्हणाले 'व्हीआयपी संस्कृती'मुळे राजकारणावर अविश्वास

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.30 )** – सर्वच पक्षांमध्ये कार्यकर्त्यांचा मुजरा मागणारी संस्कृती निर्माण झाली आहे; कमिटमेंट पाळल्या जात नाहीत, त्यामुळे राजकारणावरचा विश्वास उरला नाही, अशा शब्दांत माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता यांनी शिवसेना (शिंदे गट) ला रामराम ठोकला. मंगळवारी सकाळी आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा पाठवल्याची घोषणा केली.

गुप्ता म्हणाले, 1990 च्या दशकात 'व्हीआयपी संस्कृती' मोडून काढण्यासाठी राजकारणात आलो. कार्यकर्त्यांच्या साहाय्याने पुढे आलो. पण, आज पुन्हा तीच संस्कृती फोफावते आहे. पक्षांमध्ये 'कमिटमेंट' केल्या जातात, पण लगेच बदल होतो. माझ्या समर्थकांसाठी झालेल्या कमिटमेंट पाळल्या गेल्या



नाहीत. राजकीय प्रवासाचा आढावा घेताना त्यांनी सांगितले, एकेकाळी नेत्यांपर्यंत पोहोचण्यासाठी मध्यस्थ लागत नव्हता; आज मात्र कार्यकर्त्यांना दारातही थारा नाही. म्हणूनच कोणत्याही पक्षात न जाण्याचा निर्णय घेतला आहे. आजच्या राजकारणात माझ्यासारख्या कार्यकर्त्याला स्थान नाही, त्यामुळे मी 'आऊटडेटेड' मानला जातो.

गुप्ता यांनी यापुढे कोणत्याही पक्षात प्रवेश करणार नसल्याचे स्पष्ट केले. मात्र, न्याय न झाल्याची भावना असलेल्या, हिंमत असलेल्या आणि अपक्ष निवडणूक लढण्याची तयारी असलेल्या कार्यकर्त्यांना साथ देईन, असे ते म्हणाले. जनकल्याण संघटनेमार्फत योग्य उमेदवारांना बळ देण्याचे काम करतील, तसेच टीकेचा मार्ग न स्वीकारता स्वतःच्या भूमिकेवर ठाम राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

**महाराष्ट्र शासन**

**विशेष प्रकल्प विभाग, अमरावती**

**ई-निविदा सूचना क्र. 22 सन 2025-2026 ( जा.क्र.5801 / निलि/दि.29.12.2025 )**

**ई-निविदा सूचना ( ई निविदा प्रणालीव्दारे )**

कार्यकारी अभियंता, वि.प्र. विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख प्रबोधिनी जवळ, विद्यापीठ रोड, अमरावती, पिन-444602 (दुरध्वनी क्र. 0721-2668003) व्दारे खालील कामांचे ब-1 नमुन्यातोल ऑनलाईन निविदा महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या वतीने https://mahatenders.gov.in ई-निविदा प्रणालीव्दारे पात्र निविदाकारांकडून मागविण्यात येत आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत ( रु. ) |
|---|---|---|
| 1 | राज्य रेशीम पार्क अमरावती येथील रेशीम पथदर्शक फार्म मधील किटक संगोपन गृह इमारत व प्रशिक्षण केंद्र व्यवस्थापन मधील निवासी प्रशिक्षण शेतकरी इमारत तसेच प्रशिक्षण सभागृह इमारतीचे दुरुस्तीचे काम सुरु करणेबाबत.ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती | 9.64,436/- (रु. नऊ लक्ष चौसष्ट हजार चारशे छत्तीस फक्त) |

| | | |
|---|---|---|
| निविदा डाऊनलोड व भरण्याचा कालावधी | :- | दि. 31.12.2025 ते 07.01.2026 @ 18.00 वाजेपर्यन्त |
| तांत्रिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक दिनांक व वेळ | :- | कार्यकारी अभियंता, वि.प्र. विभाग, अमरावती 12.01.2026 रोजी 10.30 वाजता |

**Note: Physical Submission:**

1. **The Bidder shall submit the Hard Copy in "Sealed Envelope" of Technical & Financial Bids as specified in NIT after the online submission of Bid ("Bid Lock") within 72 hrs. i.e on Dt. 08.01.2026 To 11.01.2026 during office hours.**
2. Please note the further changes regarding this work will not be published through corrigendum by press notice. The changes will be available only on electronic tendering system of Government of Maharashtra which is available on the Portal https://mahatenders.gov.in & www.mahapwd.com
3. All the relevant details, Specification of work. Tender & Conditions etc. are available on portal https://mahatenders.gov.in & www.mahapwd.com
4. Tender Document Fee and EMD will be paid via online (RTGS/NEFT) mode only. It should be ensured that the Bid Security is paid online through the bidders account only.
5. कोणतेही कारण न दर्शविता एक अथवा सर्वच निविदा स्विकारण्याचा/नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार निमस्वाक्षरीकारानी राखुन ठेवला आहे.

( कृणाल पिंजरकर )
कार्यकारी अभियंता
विशेष प्रकल्प विभाग, अमरावती.

जिमाका./अम./जाहि./160/2025-2026

# 8 महिन्यात 107 बालमृत्यू, चार माता मृत्यू

## मेळघाटातील धक्कादायक वास्तव ◆ कुपोषणाचे जाळे कायम; आरोग्य यंत्रणेच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

**मारोती पाटणकर**

**चुरणी,( दि.30 )-** धारणी व चिखलदरा या दोन तालुक्यांत 1 एप्रिल ते 30 नोव्हेंबर दरम्यान 107 बालकांचा मृत्यू आणि चार मातांचा प्रसूतीदरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मेळघाटात बालमृत्यू व माता मृत्यूचे प्रमाण चिंताजनक पातळीवर असून, शासनाच्या कोट्यवधींच्या योजनांचा अपेक्षित परिणाम दिसून येत नाही, अशी टीका स्थानिकांकडून



होत आहे.

राज्य व केंद्र शासनामार्फत मेळघाटात आरोग्य सुधारणा, माता-बाल पोषण, कुपोषण निर्मूलन, आरोग्य सुविधा विस्तार यासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर केला जातो. अकरा प्राथमिक आरोग्य केंद्रे, दोन ग्रामीण रुग्णालये, एक उपजिल्हा रुग्णालय, अनेक उपकेंद्रे अशा सुविधा असूनही, कुपोषणामुळे बालकांचे मृत्यू थांबण्याचे नाव घेत नाहीत. यामुळे आरोग्य विभागाच्या कार्यतंत्रावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दारिद्र्य, रोजगाराचा अभाव, कमी शैक्षणिक पातळी, स्वच्छ पाण्याची समस्या, तसेच दळणवळणातील अडचणी यामुळे आरोग्य सेवेचा नागरिकांना पुरेसा लाभ मिळत नसल्याचे चित्र आहे. परिणामत: मेळघाटातील अनेक

### मेळघाटातील मूलभूत प्रश्न

- रोजगाराचा अभाव; स्थलांतरित होणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या वाढली
- चाळीसगावसह 22 गावांमध्ये अजूनही वीज नाही
- रस्ते व दळणवळण व्यवस्था ढासळलेली
- सुरक्षित पिण्याच्या पाण्याची कमतरता
- 'या सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध झाल्यासच जीवनमान सुधारेल' - नागरिकांची भूमिका

आदिवासी कुटुंबे आजही स्थलांतर करण्यास भाग पडत आहेत.

'मेळघाटातील बालमृत्यू व माता मृत्यू केव्हा थांबणार?' असा सवाल आदिवासी बांधवांनी केला असून, शासनाने केवळ योजना जाहीर न करता त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी होत आहे.

# माहुली चोर परिसरात वन्यप्राण्यांचा कहर; पिकांचे मोठे नुकसान

## नुकसानीची भरपाई गावातच अर्ज स्वीकारण्याची शेतकऱ्यांची मागणी

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.30 )** - नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील माहुली चोर परिसरात वन्यप्राण्यांमुळे शेतकऱ्यांचे गंभीर आर्थिक नुकसान होत आहे. रोही, हरीण, डुक्कर आणि माकडे या प्राण्यांचा बाभूळबन व जळू नदीलगत असलेल्या शेतांमध्ये सतत वावर असून पिकांची नासधूस वाढत आहे. परिणामी शेतकरी सतत धास्तावले आहेत.

वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या नुकसानीबाबत भरपाईसाठी शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज करावा लागतो. मात्र, अर्जाची प्रत वडाळी (अमरावती) येथील वनविभागाच्या कार्यालयात प्रत्यक्ष जमा करावी लागत असल्याने हा प्रवास शेतकऱ्यांसाठी खर्चिक व



गैरसोयीचा ठरत आहे. त्यामुळे अर्ज गावातच स्वीकारण्याची सुविधा सुरू करावी, अशी मागणी तातडीने होत आहे.

थंडीच्या दिवसातही अनेक शेतकरी रात्री शेतात मुक्काम करत पिकांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतात, तरीही प्राणी पिकांचे नुकसान टाळले जात नाही. मिळणारी नुकसानभरपाई अत्यल्प असल्याचीही शेतकऱ्यांची तक्रार आहे. वन्यप्राण्यांचा बंदोबस्त, नुकसानभरपाईत वाढ व अर्जप्रक्रिया सुलभ करण्यासाठी येथील ग्रामपंचायत सदस्य निखील चोरे, रोषण पवार यांच्यासह अंकुश कोल्हे, अक्षय पवार, विशाल राऊत, राहुल डोंगरे, संदीप जगताप, अनंत तिखीले, सौरव सुरोसे, भूषण साव, मनीष देठे, निखील डोंगरे आदी शेतकऱ्यांनी वनविभागाकडे निवेदन सादर केले आहे.

# एबी फॉर्मसाठी टाहो, किंकाळ्या आणि गोंधळ

## समाजसेवेच्या नावाखाली सत्तेची हव्यासापायी राजकारणाची दिशा बदलली?

**बादल डकरे**

**चांदूर बाजार,( दि.30 )-** राज्यात महानगरपालिका निवडणुकांची धामधूम सुरू असताना लोकशाहीचा उत्सव साजरा व्हावा, अशी अपेक्षा असते. मात्र त्याऐवजी अलीकडच्या काही दिवसांत समोर आलेले चित्र चिंताजनक आहे. पक्षाच्या उमेदवारीसाठी विशेषत: एबी फॉर्मसाठी इच्छुक कार्यकर्त्यांची धावपळ, टाहो, वाद, निदर्शने आणि नेत्यांच्या गाड्यांच्या मागे धावत विनवण्या करताना दिसत आहेत. कुठे टॉवर चढणे, कुठे पक्षकार्यालयात भांडण, तर कुठे सोशल मीडियावर थेट प्रसारणातून आक्रोश, या गोंधळामुळे लोकशाहीचा सार हरवतोय का, हा प्रश्न निर्माण होत आहे.

उमेदवारी न मिळाल्यास अपक्ष म्हणून उभे राहण्याची परंपरा राज्यात पूर्वीपासून आहे. अनेकांनी कोणत्याही पक्षाचे चिन्ह नसतानाही लोकांशी प्रामाणिक नाळ जुळवून विजय मिळवला आहे. त्यामुळे





समाजसेवेची खरी तळमळ असेल, तर केवळ पक्षाची मोहर आवश्यक नाही; हे सत्य विसरल्याचे दिसते. आजची परिस्थिती मात्र वेगळी आहे उमेदवारी न मिळताच संताप, प्रशासनावर दबाव, आणि भावनिक ब्लॅकमेलचे प्रकार समोर येत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओंमध्ये महिलांचा आक्रोश, पुरुषांचे आक्रमक वर्तन आणि कार्यकर्त्यांची असहायता दिसते. मतदारांनी मग कोणावर विश्वास ठेवावा? भावनिक उद्रेक करणाऱ्यांवर, की प्रत्यक्ष कार्य करून दाखवणाऱ्यांवर? समाजसेवा ही फक्त राजकीय खुर्ची मिळाली तरच साध्य होते, असा गैरसमज पसरवला जात आहे. खऱ्या समाजसेवेसाठी निष्ठा, सातत्य आणि जमिनीशी नाळ जोडणं महत्त्वाचं हेच विसरलं जात आहे. आता निर्णय मतदारांच्या हातात आहे. फॉर्मसाठी गोंधळ घालणाऱ्यांपेक्षा अपक्ष असला तरी कर्तृत्ववान, प्रामाणिक आणि लोकांसाठी उपलब्ध राहणाऱ्या उमेदवारांचा विचार करण्याची वेळ आली आहे. अन्यथा, एबी फॉर्मसाठी सुरू असलेला हा गदारोळ लोकशाहीचा नव्हे, तर तिच्या अध:पतनाचा इशारा ठरेल.

### फूल लावून पळविले

**अमरावती** - चांदूर बाजार पोलिस स्टेशन येथे अल्पवयीन मुलीला फूस लावून पळविण्याची तक्रार दाखल झाली. सूरज चव्हाण (रा.जमन्या, म.प्र.) असे आरोपीचे नाव आहे. सूरजविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्याने शुक्रवारी सायंकाळी मुलीला पळवून नेले.

# वर्षाअखेरीचा 'मन की बात' कार्यकर्त्यांना नवी प्रेरणादायी - यावलकर

महासागर | प्रतिनिधी

**वरूड,( दि.30 )** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वर्षातील शेवटच्या 'मन की बात' या रेडिओ कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण रविवारी (दि. 28 डिसेंबर) आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांच्या कार्यालयात करण्यात आले. अमरावती जिल्ह्याचे सरचिटणीस प्रा. डॉ. सुमित पवार यांच्यासह भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात पंतप्रधानांनी सामाजिक उपक्रम, युवक-



महिलांचे योगदान, आत्मनिर्भर भारताची वाटचाल आणि सकारात्मक उपक्रमांचा उल्लेख करत राष्ट्रउभारणीसाठी एकजुटीचे आवाहन केले. थेट प्रक्षेपणादरम्यान उपस्थितांनी लक्षपूर्वक ऐकून सकारात्मक प्रतिसाद दिला. पंतप्रधानांच्या विचारांमुळे सामाजिक बांधिलकी, संघटनात्मक शिस्त आणि जनसंपर्क वाढवण्याची प्रेरणा मिळाल्याचे आमदार यावलकर यांनी सांगितले. 'मन की बात' हा केवळ कार्यक्रम नसून, सामान्य नागरिकांशी संवाद साधणारा प्रभावी मंच असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. एकूणच, वर्षाअखेरीचा हा कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# चांदूर रेल्वेच्या इतिहासात पहिली सुदर्शन समाजाची नगरसेविका

## ॲड. कीर्ती राहुल इमले यांच्या विजयाचा जल्लोष



महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,( दि.30 )** - चांदूर रेल्वे शहराच्या राजकीय इतिहासात प्रथमच सुदर्शन समाजातून नगरसेविका निवडून येण्याची ऐतिहासिक नोंद झाली आहे. सुदर्शन समाजाच्या उमेदवार ॲड. कीर्ती राहुल इमले यांनी दणदणीत विजय मिळवत समाजाचा मान उंचावला आहे. या विजयामुळे समाजात उत्साहाचे वातावरण असून, हा क्षण सुदर्शन समाजासाठी अभिमानाचा ठरला आहे.

दिनांक 24 डिसेंबर रोजी त्यांच्या सन्मानार्थ भव्य स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले. संध्याकाळी सहा वाजता समाजबांधव मोठ्या संख्येने एकत्र येत ढोल-ताशांच्या गजरात, फटाके व आतषबाजीसह जल्लोषात जुलूस काढण्यात आला. हा जुलूस इमले दाम्पत्यांच्या निवासस्थानी पोहोचताच ॲड. कीर्ती इमले व राहुल इमले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मिठाई वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित समाजबांधवांनी उत्स्फूर्त नृत्य करत आनंदोत्सव साजरा केला. याच प्रसंगी मित्रपरिवारातील नव्याने निवडून आलेले नगरसेवक मोहम्मद अनिस शेख गफ्फार आणि नगरसेविका प्रियंका सतपाल वरठे यांचाही सन्मान करण्यात आला. सुदर्शन समाजाकडे आता आपले प्रश्न, हक्क व हितासाठी आवाज उठवणारा सक्षम आणि कर्तृत्ववान लोकप्रतिनिधी आहे, ही बाब समाजासाठी अभिमानाची असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# अतुल ठाकरे यांना आचार्य पदवी जाहीर

**चांदूर रेल्वे, ( दि. 30 )-** शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचलित बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अतुल भुजंगराव ठाकरे यांना विद्यापीठाच्या अधिसूचनेनुसार आचार्य (पीएचडी) पदवी जाहीर झाली आहे. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक येथे डॉ. राजश्री मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षणशास्त्र विषयात संशोधन पूर्ण



केले. डिजिटल शिक्षण व कृतियुक्त शिक्षणाच्या परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास हा त्यांचा संशोधन विषय असून सातत्य, अभ्यासू दृष्टिकोन व संशोधननिष्ठतेमुळे त्यांचे कार्य विशेष ठरले. शैक्षणिक, साहित्यिक व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या ठाकरे यांना राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासह विविध संस्थांचे सन्मान मिळाले आहेत.

# पुरस्कारांच्या वाटपावर प्रश्नचिन्ह!

## कर्तृत्वाचा अपमान थांबवावा ◆ नागरिकांमध्ये संताप

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि.30 )** - तालुक्यात सध्या पुरस्कारांच्या वाटपाबाबत संताप उसळला असून, समाजमनात अस्वस्थता वाढली आहे. विविध क्षेत्रांत ठोस योगदान नसतानाही काही निवडक व्यक्तींच्या गळ्यात नामांकित पुरस्कार पडत असल्याची चर्चा जोर धरत आहे. 'कसले काम आणि कसला सन्मान?' असा रोखठोक सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

पुरस्कार म्हणजे नैतिक कर्तृत्व, त्याग, प्रामाणिकता आणि समाजासाठी केलेल्या कामाची योग्य दखल, अशी सर्वसामान्यांची धारणा. मात्र तालुक्यात सध्या ज्या पद्धतीने पुरस्कारांचे वाटप होत आहे, त्यात या मूल्यांची घोर उपेक्षा होत असल्याचा आरोप होत आहे.

ज्या क्षेत्राशी संबंध नाही, त्या क्षेत्रातील पुरस्कार घेण्याची स्पर्धा काहींच्यात दिसते; तर खरी मेहनत घेणारे समाजसेवक, शिक्षक, खेळाडू, कार्यकर्ते यांना योग्य मान मिळत नसल्याने ते उपेक्षितच राहतात, ही खंत नागरिकांनी



व्यक्त केली. ओळखी, शिफारशी, राजकीय पाठबळ आणि प्रसिद्धीच्या आधारे सन्मान मिळत असल्याची भावना सर्वसामान्यांत रुजत असून, अशा सन्मानांचा दर्जा 'पुरस्कारांचा बाजार' म्हणून वर्णन केला जात आहे. निकष, पडताळणी व पारदर्शकता नसल्याने या सन्मानांची विश्वासार्हता धोक्यात आल्याचा जनतेचा सूर आहे. 'खरे कर्तृत्व शांत आहे आणि पोकळ सन्मान आरडाओरडा करत आहेत,' असे मत व्यक्त करत नागरिकांनी पुरस्कार देणाऱ्या संस्था व समित्यांनी तातडीने आत्मपरीक्षण करण्याची मागणी केली आहे. अन्यथा समाजाचा विश्वास ढासळेल, असा इशारा सुज्ञ नागरिकांनी दिला आहे.

# महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेच्या दिनदर्शिकेचे अनावरण



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 30 )** शासनमान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई-32 च्या अमरावती जिल्हा शाखेतर्फे दिनदर्शिका 2026 चे भव्य अनावरण 28 डिसेंबर 2025 रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमास संघटनेचे राज्याध्यक्ष रविंद्र लोटन पाटील व माजी राज्य सचिव परमेश्वर बाबर यांचे मार्गदर्शन लाभले. अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी संदीप बोडके होते.

आयोजनाची जबाबदारी जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित व सचिव किशोर मालोकार यांनी सांभाळली. प्रवीण खांडेकर, अजित पाटील, विजया झाडे, अनिल डाखोरे, मोहन जाधव आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात मालोकार यांनी दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

वक्त्यांनी संघटनेच्या उपक्रमांचे कौतुक करत, दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठीचे कार्य प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. सुत्रसंचालन उपाध्यक्षा शालिनी बोरखडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रसिद्धी प्रमुख राजू डांगे यांनी केले. कार्यक्रमास जिल्हा-तालुका पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. कार्यक्रमातून दिव्यांग कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.

# घरकुल अनुदानवाढीची घोषणा हवेतच!

## मोफत सौर पॅनेललाही ठेंगा; लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी

महासागर | प्रतिनिधी

**परतवाडा, ( दि.30 )-** प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत घरकुलाच्या अनुदानात आणि मोफत सौरऊर्जा सुविधेसाठी अतिरिक्त निधी देण्याची मार्च 2024 मधील शासनाची घोषणा अद्यापही कागदोपत्रीच अडकून पडली आहे. घरकुलासाठी 35 हजार आणि मोफत सौर पॅनेलसाठी 15 हजार, असे एकूण 50 हजार रुपये वाढीव अनुदान देण्याचा निर्णय झाला असला, तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याने लाभार्थ्यांच्या नाराजीचा कडेलोट झाला आहे. सरकार फक्त घोषणा करून लाभार्थ्यांच्या तोंडाला पाने पुसत असल्याच्या प्रतिक्रिया सर्वत्र व्यक्त होत आहेत.



राज्यातील एकही कुटुंब पक्क्या घराविना राहू नये, या उद्देशाने केंद्र व राज्य सरकारकडून विविध घरकुल योजना राबवल्या जातात. सध्या प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेत लाभार्थ्यांना 1 लाख 20 हजार रुपयांचे अनुदान मिळते. तथापि महागाई, वाढलेले बांधकाम खर्च आणि मजुरीमुळे हे अनुदान अपुरे पडत असल्याने शासनाने वाढीचा निर्णय घेतला होता. वाढीव अनुदान लागू झाल्यास लाभार्थ्यांना 1 लाख 70 हजार रुपये मिळणार होते. परंतु प्रत्यक्षात एक रुपयाही न मिळाल्याने ही घोषणा फसवी ठरल्याची चर्चा आहे.

युवाशक्ती ग्रामविकास संघटनेने शासनाला अनेक वेळा लेखी निवेदनांद्वारे पाठपुरावा केला. मात्र, अद्याप कोणताही स्पष्ट आदेश अथवा उत्तर मिळाले नाही. जिल्ह्यात हजारो कुटुंबांना घरकुल मंजूर असतानाही अत्यल्प घरकुले पूर्ण झाली आहेत. जुन्या प्रणालीतून थेट अनुदान मिळत असताना, नव्याने सुरू केलेल्या 'स्पर्श' प्रणालीत तांत्रिक अडचणींमुळे लाभार्थ्यांचे हप्ते रखडले आहेत.


सौर पॅनेल बसविण्याची जबाबदारी महावितरण, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद की शासनाची? याबाबतही कोणतीही नियमावली अस्तित्वात नसल्याने गोंधळ अधिक वाढला आहे. पहिला हप्ता मिळाल्यानंतर पुढील हप्ते रखडणे, कार्यालयांकडून सूचना आलेल्या नाहीत अशी उत्तरे मिळणे, यामुळे लाभार्थ्यांची सर्वत्र निराशा झाली आहे. सरकारने घेतलेले निर्णय हवेत तरंगत राहणार की त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत.

# इंटर-स्कूल डिबेट स्पर्धेत जिकरा ऐमन युनुस शाहचा ठसा

## उत्कृष्ट कामगिरीसह द्वितीय क्रमांक

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,( दि.30 )** - श्रीमती कृष्णाबाई सारडा इंग्लिश स्कूलतर्फे आयोजित इंटर-स्कूल डिबेट स्पर्धेत ज्ञानपीठ इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी जिकरा ऐमन युनुस शाह हिने द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश मिळवले. अंजनगाव, परतवाडा, अकोट व दर्यापूर येथील विविध शाळांमधील एकूण 24 स्पर्धकांमध्ये तिची कामगिरी विशेष ठरली. या वर्षीच्या वादविवादाचा विषय "Is



Artificial Intelligence a Threat to Human Jobs?" असा होता. या विषयावर जिकराने सखोल अभ्यास, मुद्देसूद मांडणी आणि प्रभावी वक्तृत्वाच्या जोरावर परीक्षक तसेच उपस्थितांची दाद मिळवली. आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाची पावती म्हणून तिला द्वितीय क्रमांकाने गौरविण्यात आले. या यशाबद्दल संस्था अध्यक्ष शंकरराव गावंडे, सचिव राजश्री गावंडे, प्राचार्य मनोज मुस्कर, शिक्षकवृंद व पालकांनी जिकराचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कामगिरीमुळे ज्ञानपीठ इंग्लिश स्कूलच्या लौकिकात आणखी भर पडली आहे.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

